* माहिती *

**वाशिम जिल्हा पोलीस दल**

visit as http://www.washimpolice.org

प्रेस नोट

---

दिनांक :— १८/०३/२०१९

**मा.पोलीस अधिक्षक श्री. वसंत परदेशी यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हयात अवैध धंदयाविरुध्द कार्यवाही.**

मा. पोलीस अधिक्षक श्री.वसंत परदेशी यांनी अवैध धंदयाविरुध्द सुरु केलेल्या विशेष मोहिमे अंतर्गत संपुर्ण वाशिम जिल्हयामध्ये दिनांक १७/०३/२०१९ रोजी विविध कारवायांचा तडाखा दिला. त्यामध्ये वाशिम जिल्हयात प्रोव्हीबीशन ०९ केसेस करुन ३१,२७०/—रु चा माल जप्त केला. तसेच जुगार कायदयाअंतर्गत ०१ गुन्हा दाखल करुन ४१०/— रुपयाचा माल जप्त करण्यात आला. दिनांक १७/०३/२०१९ च्या रात्री विशेष मोहिमे अंर्तगत ०५ अजामीनपात्र वॉरंटची बजावणी केली, तर २२ समन्सची बजावणी करण्यात आली असुन ०३ जामीनपात्र वॉरंटची बजावणी व ०१ पाहिजे आरोपीस अटक करण्यात आली आहे.

जिल्हा पोलीस अधिक्षक यांनी अवैध धंदाविरूद्ध सुरू केलेली मोहिम अधिक तिव्र केली असुन सदर बाबत नागरिकांमध्ये सर्वत्र समाधान व्यक्त करण्यात येत आहे. तसेच मतदान प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत ऑल आऊट ऑपरेशन,नाकाबंदी अशाप्रकारच्या मोहिम दररोज राबविण्यात येणार आहेत. तरी सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, आपणास काही आक्षेपाहर्य आढळल्यास त्याबाबत आपण निसंकोच पणे नियंत्रण कक्ष वाशिम येथे माहिती कळवावी. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल.

पोलीस निरिक्षक

स्थानिक गुन्हे शाखा,वाशिम